सत्यमेव जयते

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**
**(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)**
रायगडभवन,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई ४००६१४
Email icdsest21@gmail.com Tel. No.022-27576388,322,323 Fax 022-27576324

जाक्र/एबाविसेयोआ/आस्था/का-1/मु.से.रिक्तपदांचेमागणीपत्रकपाठविणे-2026-27/ 3367 /नवीमुंबई/दिं :31.07.2026.
05 AUG 2026

**प्रति,**
**विभागीय उपआयुक्त,**
**महिला व बाल विकास,**
**कोकण,पुणे,नाशिक,छ.संभाजीनगर,**
**अमरावती व नागपूर विभाग.**

विषय :अंगणवाडी सेविकातून मुख्यसेविका पदोन्नती कोट्यातील निवडीने या प्रकारातील रिक्त पद भरती परिक्षा संदर्भात ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना सुधारित पात्रता लक्षात घेऊन कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ :1. महाराष्ट्र शासन राजपत्र, महिला व बाल विकास विभाग, नविन प्रशासकिय भवन, मंत्रालय मुंबई अधिसुचना दिनांक : 4 जून 2021.

2. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, नविन प्रशासकिय भवन, मंत्रालय मुंबई अधिसुचना दिनांक : 8 मे 2023.

3. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, नविन प्रशासकिय भवन, मंत्रालय मुंबई शासन पत्र MWC-07011(12)/19/2022-DESK-7(587170) दिनांक.8 एप्रिल 2024.

4. महिला व बाल विकास विभाग, शासन पत्र क्र.मबाआ-2021/प्र.क्र.22/का-7/ दिनांक 5 सप्टेंबर 2024.

5. या आयुक्तालयाचे पदोन्नती कोट्यातील रिक्त पदभरती पत्र क्र. 560/ दिनांक 4 फेब्रूवारी 2025.

6. या आयुक्तालयाचे पदोन्नती कोट्यातील रिक्त पदभरती पत्र क्र.2018/ दिनांक 11 एप्रिल 2025.

7. जाक्र/एबाविसेयोआ/मुसे-मविप/पदो-को-नि.भरती/2024-25/2162/नवी मुंबई/ दिनांक. 25 एप्रिल 2025.

8.जाक्र/एबाविसेयोआ/मुसे-मविप/पदो-को-नि.भरती/2025-26/2175/नवीमुंबई/ दिनांक.28 एप्रिल 2025.

9.महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक मबाआ-2025/प्र.क.62/ का-07(E-Comp.No.1114139)दि.10 ऑक्टोबर 2025.

10.महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-2023/प्र.क.42/का-07/ दिनांक 3 जुलै 2026.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते कि, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाअंतर्गत सेविका ते मुख्यसेविका पदोन्नती कोट्यातील निवडीने या प्रकारातील रिक्त 272 व सदर परिक्षेचा निकाल लागे पर्यंत रिक्त होणाऱ्या पदांची भरती परिक्षा संदर्भात ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी म्हणून संदर्भ पत्र क्र. 7 अन्वये, सुचना पत्र तसेच **महिला व बाल विकास विभाग शासन अधिसुचना दिनांक 04.06.2021 व दिनांक 08.05.2023** रोजी च्या अनुषंगाने दिलेल्या पात्रता निकषाच्या आधारे भरती प्रक्रियेसाठी सेविकेमार्फत ऑनलाईन अर्ज करण्यासाठी म्हणून स्पष्ट सुचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

सदर भरती प्रक्रियेतील पात्रतेच्या बाबतीत काही अटी व शर्ती मध्ये सुधारणा होण्याच्या अनुषंगाने अंगणवाडी संघटना व काही निवड सेविका यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई व मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर येथे केस दाखल केलेली आहे. त्याअनुषंगाने **रिट पिटिशन क्रमांक 2147/2023** च्या बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर दिनांक 08.05.2026 रोजी दिलेल्या आदेशात मुख्यसेविका / पर्यवेक्षिका या पदाच्या बाबत महिला व बाल विकास विभाग अधिसुचना दिनांक 04.06.2021 रोजी च्या सेवा प्रवेश **नियमातील नियम क्रमांक** (7)(1)**(क)** मधील अंगणवाडी सेविका या पदावरुन मुख्यसेविका या पदावर निवडीद्वारे वयाची अट 45 वर्षे रद्द केलेली असून संदर्भिय पत्र क्र.10 अन्वये, **दिनांक 03/07/2026 च्या शासन निर्णयाच्या आधारे** ज्या वर्षी भरती प्रक्रिया प्रस्तावित आहे त्या वर्षात 50 वर्षा पेक्षा जास्त वय नसेल अशा अंगणवाडी सेविका लक्षात घेऊन दिनांक 1 जानेवारी रोजी म्हणजे 01.01.2025 अर्ज भरण्याविषयी सुचना आहेत.

महिला व बाल विकास विभाग संदर्भिय पत्र क्र.9 अन्वये, दिनांक 10.10.2025 रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित पात्रता निकषाबाबत सुध्दा सुचना प्राप्त असुन हे दोन्ही शासन निर्णयान्वये त्या आधारे खालीलप्रमाणे मुख्य पात्रता निकष देण्यात येत आहेत. पात्र असलेल्या अंगणवाडी सेविकाकडून ऑनलाईन अर्ज भरुन घेण्याविषयीच्या सुचना संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात याव्यात.

**मुख्य पात्रता निकष** :-

1. ज्यावर्षी विभागीय परिक्षेचे आयोजन करणे प्रस्तावित आहे त्या वर्षी 1 जानेवारी रोजी सलग 10 वर्ष विनाखंड नियमित सेवा पूर्ण केलेल्या सेविका **(दिनांक 01.01.2025 पर्यंत)**
2. दिनांक 01.01.2025 रोजी वय 50 वर्षापेक्षा जास्त नसेल; **(म्हणजेच 01/01/1975 नंतर जन्मलेल्या)**
3. संवैधानिक विद्यापिठाची पदवी धारण करणाऱ्या सेविका.
4. मुख्यसेविका / पर्यवेक्षिका या पदावर रुजू झालेच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र व मराठी भाषा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल तसेच हिंदी भाषा परीक्षा तीन वर्षाच्या आत

उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. सदर पात्रता धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ व पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

ह्या आयुक्त कार्यालयामार्फत संदर्भीय पत्र क्रमांक 7 अन्वये, दिनांक 25.04.2025 रोजी दिलेल्या पद भरती बाबतच्या सर्वसाधारण सुचना तसेच या आदेशान्वये सुधारित पात्रता निकष संबंधित सेविकांच्या लक्षात आणून देवून त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी व स्वाक्षरी दस्ताऐवज जपून ठेवण्यात यावा.

ऑनलाईन अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी म्हणून संबंधित TCS-ION संस्थेस दिनांक 13.07.2026 रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या असुन दिनांक 07.08.2026 ते 21.08.2026 या तारखे पर्यंत अर्ज ऑनलाईन सादर करणेसाठी म्हणून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**माधवी सरदेशमुख,(भा.प्र.से)**
**आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.**

**माहितीस्तव सविनय सादर,**

1. **मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई.**
2. **बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सर्व. यांना सुचित करण्यात येते कि सदर पत्र सर्व कार्यरत सेविका यांच्या लक्षात आणून देवून स्वाक्षरी घेण्यात यावी व सदर दस्ताऐवज कार्यालय स्थरावर जपून ठेवण्यात यावा.**
3. Regional Sales Hed-Tcs-ION
   TaTa Consultancy Services Ltd.